



श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्थेचे

# श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, कोल्हापूर

# वाटचाल ५० वर्षांची

(१५ जून १९७१ - १५ जून २०२१)




**युगांतर** २०२१

संपादक - प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण

# ‘आमची मातृसंस्था’ : श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्था, कोल्हापूर



छ. श्री शाहू मराठा (व्हिक्टोरिया) बोर्डिंगचा पायाभरणी समारंभ १९०१

आधुनिक महाराष्ट्राच्या समाजसुधारणेच्या इतिहासातील अग्रगण्य व महाराष्ट्राच्या सामाजिक पुनर्घटनेचे शिल्पकार म्हणून राजर्षी शाहू महाराजांचे नाव एकमुखाने येते. राजर्षी शाहू महाराजांनी शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक सुधारणा केल्या. महाराष्ट्रामध्ये वसतिगृहांची चळवळ श्रीमंत शाहू छत्रपती महाराज यांच्या प्रेरणेतून सुरू झाली. त्यांनी विविध जातीतील विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह सुरू केली. यामध्ये, दि. १८ एप्रिल १९०१ रोजी ‘मराठा एज्युकेशन सोसायटी’ या संस्थेची स्थापना करण्यांत आली. या संस्थेतर्फे ‘व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग हाऊस’ सुरू करण्यात आले. राजर्षी शाहू छत्रपती महाराजांच्या उपस्थितीत दि. २५ सप्टेंबर १९०१ रोजी कर्नल सी. डब्ल्यू. एच. सिलि, पोलिटिकल एजंट कोल्हापूर संस्थांच्या हस्ते वसतिगृहाची पायाभरणी झाली. संस्थेच्या माध्यमातून सन १९३५ मध्ये ‘राजाराम विभाग’ व सन १९५५ मध्ये ‘श्री शहाजी विभाग’ या वसतिगृहाची नव्याने उभारणी करण्यात आली.

राजर्षी शाहू छत्रपती महाराजांनी बहुजन समाजाच्या उद्धारासाठी आपले आयुष्य वेचले यासाठी त्यांचे नाव या संस्थेस देणे औचित्याचे असल्याने सन १९४८ मध्ये ‘मराठा एज्युकेशन सोसायटी’ व ’व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग हाऊस’ या संस्थांना अनुक्रमे ‘श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्था’ व ‘श्री शाहू छत्रपती विद्यार्थी वसतिगृह’ कोल्हापूर असे संबोधण्यात यावे असा ठराव केला. त्यानंतर दि. १६ ऑगस्ट १९५२ रोजी संस्थेच्या नावात बदल करून संस्थेने चालविलेल्या वसतिगृहाच्या नावात ‘श्री शाहू छत्रपती मराठा शिक्षण संस्था’ व ‘श्री शाहू छत्रपती मराठा विद्यार्थी वसतिगृह’ असा बदल झाला.

‘श्री शाहू छत्रपती मराठा शिक्षण संस्था’, ‘श्री शाहू छत्रपती मराठा विद्यार्थी वसतिगृह’ व ‘श्री राजाराम छत्रपती मेमोरियल ट्रस्ट’ या संस्थांची ध्येय, धोरण, उद्दिष्ट्ये, आणि कार्य एकच असल्याने दि. ११ एप्रिल १९७२ रोजी ‘श्री शाहू छत्रपती मराठा शिक्षण संस्था’ या नावाने एकत्रित करण्यात आल्या. पुढे दि. ७ मे १९७२ रोजी ‘श्री शाहू छत्रपती मराठा शिक्षण संस्थे’च्या नावातील ‘मराठा’ हा शब्द वगळून त्यानंतर दि. १४ ऑगस्ट १९७३ रोजी या तिन्ही संस्था मिळून ‘श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्था’ असे नामकरण करण्यात आले.

सध्या श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्थेच्या जवाहरनगर हायस्कूल, श्री साई हायस्कूल व जुनियर कॉलेज, श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, श्री शाहू छत्रपती आय.टी.आय., वेणूताई चव्हाण होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज आणि यशवंतराव चव्हाण हॉस्पिटल, राजर्षी शाहू छत्रपती इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी व श्रीपतराव बोंद्रे इंग्लिश मिडीयम हायस्कूल इत्यादी शाखा कार्यान्वित आहेत.

